# बोर्ड प्रश्नपत्रिका : मार्च २०१८
# मराठी कुमारभारती

**वेळ: 2 तास** **एकूण गुण : 80**

**सूचना:**

1. सूचनेनुसार आकलनकृती व व्याकरण यांमधील आकृत्या काढाव्यात.
2. आकृत्या पेनानेच काढाव्यात.
3. उपयोजित लेखनातील प्रश्नांसाठी (सूचना, निवेदन) आकृतीची आवश्यकता नाही. तसेच हे प्रश्न लिहून घेऊ नयेत.
4. स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन याकडे जाणीवपूर्वक लक्ष दयावे.

**विभाग – 1: गदय**

**प्र.1. अ. खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

1. i. [ ] — बाजी रेठरेकरांचा मृत्यू — [ ] **[1]**

ii. वेणूबाईंना वापरलेली संबोधने → [ ] [ ] **[1]**

गंगाजान्हवीसमान मातुश्री वेणूबाई काकी वडिलांचे सेवेसी:-
अपत्ये बाजीराव बल्लाळ साष्टांग नमस्कार वि।। येथील ता. पौष वद्य 13 पावेतों स्वकीय लिहित जाणे. विशेष पौष शु।। 11 स तारापुरावर हल्ला केला ते समयीं बाजी भिंवराव तोंडांत गोळी लागून कैलासवासी जाहले. ईश्वरें मोठें अनुचित केलें! तुम्हास मोठा शोक प्राप्त जाला. आमचा तर भाऊ गेला त्यास, तुम्ही वडील. दुखाचें परिमार्जन करून विवेक करावा. त्यांची मुलें व चिमणाजी आप्पा आहेत, त्यांचेहि त्याजपेक्षां अधिक चालेल; परंतु आमचा भाऊ गेला. बाजू गेली. उपाय नाहीं. त्यास, चिमणाजी भिंवराव हे पाठविले आहेत. हें सांगतील तें ऐकावें. सारांश, मीच तुमचा बाजीराव असा विवेक करून धीर धरावा. मजवर दृष्टी द्यावी. बहुत काय लिहिणें, लोभ कीजे हे विनंती.

**2. योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

i. बाजीराव बल्लाळ लिखित पत्राचा प्रकार________ **[1]**

अ) आभारपत्र  ब) सांत्वनपरपत्र
क) तक्रारपत्र  ड) अभिनंदनपरपत्र

ii. बाजी रेठरेकर आणि भीवरावांचे नाते________ **[1]**

अ) काका-पुतण्या  ब) मामा-भाचा
क) भाऊ-भाऊ  ड) पुत्र-पिता

**3. तक्ता पूर्ण करा.** **[2]**


खालील वाक्यांतील काळ ओळखा.

| **क्र.** | **वाक्य** | **काळ** |
|---|---|---|
| i. | परंतु आमचा भाऊ गेला. | ________ |
| ii. | दु:खाचे परिमार्जन करून विवेक करावा. | ________ |

4. तुमच्यावर प्रभाव टाकणाऱ्या कोणत्याही एका व्यक्तीचे गुणविशेष 8 ते 10 वाक्यांत लिहा. **[2]**

**ब. खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**1. आकृतिबंध पूर्ण करा.** **[2]**




ग्रामसंस्कृतीतल्या लोकजीवनाचा थोडासा बारकाईने विचार केला, तर असे दिसून येईल, की या जीवनाला कष्ट, चिंता आणि असुरक्षितता यांचा उपजतच शाप आहे. हे लोकजीवन नियतीच्या काटेरी चाकाने रक्तबंबाळ होत असते. दुष्काळ, महापूर, रोगाची साथ, उपासमार यांनी चिंताक्रांत बनलेले असते. नियतीच्या अदृश्य शक्तीपुढे पदोपदी हतबल होत असते आणि शेतातल्या कष्टामुळे पार आंबून गेलेले असते. त्यातच पुन्हा लोकजीवनातल्या स्त्रियांना अधिकच कष्ट उपसावे लागतात. मुलांचे संगोपन करणे, घरातील दैनंदिन कामे करणे, फावल्या वेळात शेतात राबणे, जळणफाटा तोडणे, चारा आणणे, धारा काढणे, दळण दळणे, सणसोहळ्यांच्या निमित्ताने दिवसभर राबराब राबणे हे स्त्रियांच्या नशिबी अगदी पोरवयापासूनच आलेले असते. विसावा नाही. दिलासा नाही. करमणूक तर नाहीच नाही. ही त्यांची जीवनसरणी असते. हसणे त्या पार विसरूनच गेलेल्या असतात. अशा परिस्थितीत लोकजीवनाच्या अन् स्त्रियांच्या मुखावर एखादी स्मितरेषा उमटविण्याचे महत्त्वाचे काम हा फिरस्ता बहुरूपी करत असतो. तो माणसाला हसण्याचे स्मरण देतो, हसायला शिकवतो. विनोदाची एक वेगळी लज्जत त्यांना चाखायला देत असतो. ग्रामसंस्कृतीचे तेच ते बेचव बनलेले रोजचे कंटाळवाणे जीवन जगताना सुसह्य व्हावे, यासाठी तो विनोदाच्या माध्यमातून एक टॉनिकच देत असतो.

**2. ग्रामीण जीवनात येणाऱ्या नैसर्गिक आपत्ती:** **[2]**

i. ________ ii. ________

iii. ________ iv. ________

**3. खालील वाक्यातील अधोरेखित शब्दाची जात ओळखा.**

i. या जीवनाला कष्ट, चिंता <u>आणि</u> सुरक्षितता याचा उपजतच शाप आहे. **[1]**

ii. उताऱ्यात आलेले अव्ययीभाव समासाचे उदाहरण शोधून लिहा. ☐ **[1]**

4. 'जीवनातील विनोदाचे स्थान' या विषयी तुमचे विचार **आठ** ते **दहा** वाक्यांत लिहा. **[2]**

**क. खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

1. i. मानवी स्वभावाचे दुर्गुण: [1]

   1. _______ 2. _______

   ii. आकृतिबंध पूर्ण करा. [1]

   या उताऱ्यामध्ये असलेली म्हण व अर्थ शोधून लिहा.
   - म्हण: ______
   - अर्थ: ______

> दुसऱ्याच्या डोळ्यांतील कुसळ दिसते; पण स्वत:च्या डोळ्यांतील मुसळ दिसत नाही. अशी मराठीत एक म्हण आहे. ही म्हण मानवाच्या सामान्य व्यवहारांवर प्रकाश टाकणारी आहे. सामान्यत: आपणास असे आढळते, की मनुष्य स्वत:साठी क्षमाशील असतो; पण दुसऱ्यासाठी अतिशय कर्तव्यकठोर बनतो. आपल्या हातून चूक झाली असतां तो अनेक लंगड्या सबबी पुढे करतो व स्वत:चा निर्दोषपणा सिद्ध करण्याचा प्रयत्न करतो; पण याउलट दुसऱ्या माणसाने थोडीही चूक केली, तर त्याला खपत नाही. तो त्याला कठोर वाक्ताडन करतो. त्याच्या परिणामाचाही तो कधी विचार करीत नाही किंवा स्वत:ची काय स्थिती-गति-योग्यता आहे ही गोष्टही त्याच्या मनात येत नाही. क्षमाशीलतेच्या अभावी अनेक कोवळी जीवने करपून जातात.

2. 'क्षमाशीलतेच्या अभावी अनेक कोवळी जीवने करपून जातात' उताऱ्यात आलेला हा विचार तुमच्या शब्दांत 8 ते 10 वाक्यांत स्पष्ट करा. [2]

## विभाग – 2: पद्य

2. अ) **खालील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

   1. योग्य जोड्या जुळवा. [2]

| | | | |
|---|---|---|---|
| विद्वत्ता | शूरता | धैर्य | सहिष्णुत्व |
| देवपण | संकटकाळ | समर | श्रीमंती |

| क्र. | 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|---|
| 1. | | |
| 2. | | |
| 3. | | |
| 4. | | |

> विपत्काळीं धैर्य, प्रभुपणि सहिष्णुत्व बरवें।
> सभे पांडित्याचा प्रसर, समरीं शौर्य मिरवे।।
> स्व-किर्तीच्या ठायी प्रचुर, रति विद्या-व्यसन जें।
> तयांचे हे स्वाभाविक गुण सहा सत्पुरुष जे।।1।।
> ज्यांची देह-मनें तशींच वचनें पुण्यामृतें ओतिलीं।
> कीं ज्यांहीं स्व-कृतोपकार-विभवें सर्वत्र विस्तारिलीं।।
> लोकांचे परमाणु-तुल्य गुण जे मेरूपरी वानिती।
> चित्तीं तोषहि पावती सु-जन ते नेणों किती नांदती।।2।।

2. i. खालील शब्दसमूहाला कवितेतील शब्द शोधा व लिहा. [1]

अ) स्वत: केलेले उपकार- ☐

ब) अतिशय सूक्ष्म असे - ☐

ii. योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा. [1]

प्रस्तुत कवितेचा काव्यप्रकार ________

अ) संतकाव्य ब) पंडितीकाव्य

क) शाहिरीकाव्य ड) आधुनिक काव्य

3. 'ज्यांची देह-मनें तशींच वचनें पुण्यामृतें ओतिलीं।
की ज्यांहीं स्व-कृतोपकार-विभवें सर्वत्र विस्तारलीं।।'
वरील काव्यपंक्तीमधील विचारसौंदर्य स्पष्ट करा. [2]

4. 'स्व-किर्तीच्या ठायी प्रचुर, रति विद्या-व्यसन जें।'
या ओळीतील आशय स्पष्ट करा. [2]

**ब) खालील कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

1. चौकट पूर्ण करा.

i. तरुवेलीच्या भाळावरचे मोत्यांचे टिळे म्हणजे ☐ [1]

ii. कवितेत योजिलेला अलंकार ☐ [1]

पानावरती थेंब वाजती
मातीमधुनी कोंब फुटे
नाजूक इवल्या चोचीतून अन्
मल्हाराची धून उठे

लाल पोपटी कवळी पाने
लवलवणारी जिथे तिथे
हिरवे पिवळे रंग त्यांमध्ये
केशर सांडे कुठे कुठे

ओघळता या आभाळाच्या
डोळ्यांमधले थेंब निळे
तरुवेलींच्या भाळावरती
त्या मोत्यांचे गोल टिळे

क्षणात बघते लखलखणारे
झाड विजेचे टकामका
अरे पिलांनो, पंखाखाली
जा आईच्या लपा लपा

क्षितिजापाशी इंद्रधनूने
कमान सुंदर वाकविता
ओलेत्याने टिपते डोळे
वसुंधरा हसता हसता.

2. सहसंबंध ओळखून जोड्या लावा. **[2]**

पर्ण | माती | ओली
वसुंधरा | वीज | कोंब
थेंब | झाडं | पिलं

| क्र. | 'अ' | 'ब' |
|---|---|---|
| 1. | | |
| 2. | | |
| 3. | | |
| 4. | | |

3. क्षितिजापाशी इंद्रधनूने कमान सुंदर वाकविता **[2]**
ओलेत्याने टिपते डोळे वसुंधरा हसता हसता
वरील काव्यपंक्तींतील भावसौंदर्य स्पष्ट करा.

4. क्षणात बघते लखलखणारे **[2]**
झाड विजेचे टकामका
वरील काव्यपंक्तींतील अलंकार ओळखून तो स्पष्ट करा.

## विभाग – 3: स्थूलवाचन

**3. खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** **[4]**

1. मनालीच्या स्थलदेवतेचे वर्णन करा.
2. 'कोणतीही गोष्ट अंधविश्वासाने स्वीकारू नये' या बाबतचे तुमचे मत पाठाच्या आधारे लिहा.
3. अशी घालवूया या रविवारची सुट्टी
या विषयावर
तुम्ही ⇄ तुमचे मित्र
संवादलेखन करा.

## विभाग – 4: व्याकरण

**4.** अ) पुढील काव्यपंक्तीतील उपमेय व उपमान ओळखून त्या अलंकाराचे नाव लिहा. **[2]**

'अमृताहुनि गोड नाम तुझे देवा'

| अलंकार | उपमेय | उपमान |
|---|---|---|
| | | |

ब) आकृतीत दिलेल्या शब्दांची योग्य जुळणी करून सामासिक शब्द तयार करा व समासाचा प्रकार लिहा. [2]

हर | नयन | घडी | कमल

| सामासिक शब्द | समासाचे प्रकार |
|---|---|
| 1. | |
| 2. | |

क) खालील शब्दांना 'इक्' प्रत्यय लावून शब्द तयार करा. [1]

1. अध्यात्म ______ 2. शिक्षण ______

ड) खालील पारिभाषिक शब्दांना प्रमाणभाषेतील शब्द लिहा. [1]

अ) Express Highway _______ ब) Documentary _______

इ) विरामचिन्हांना अचूक नावे द्या. [1]

| चिन्ह | नाव |
|---|---|
| ? → | |
| ; → | |

ई) i. खालील शब्दांमधील लेखननियमांनुसार अचूक शब्द ओळखा. [1]

पारंपारिक / पारंपरिक / पारंपारीक / पारमपरिक

ii. खालील वाक्य लेखननियमांनुसार लिहा.

राघवचे गीत स्विकारण्यात आले.

फ) कंसातील वाक्प्रचारांचा त्या खाली दिलेल्या वाक्यांत योग्य ठिकाणी वापर करून वाक्ये पुन्हा लिहा. [2]

(ध्यानात येणे, आळा घालणे, लोचन ओलावणे.)

1. मुलीला निरोप देताना आईच्या डोळ्यांतून अश्रू आले.
2. भ्रमणध्वनीच्या अतिवापरावर आवर घालावा.

## विभाग – 5: उपयोजित लेखन

5. अ) 1) **पत्रलेखन** [5]

पर्यावरण रक्षण – स्वसंरक्षण

पर्यावरण स्नेही मित्रमंडळ – नायगाव

**कचऱ्यापासून खतनिर्मिती**

कचराव्यवस्थापन – माहितीपुस्तिका उपलब्ध.

वरील निवेदन वाचा च पत्रलेखन करा.

| | | |
|---|---|---|
| तुमच्या गावासाठी प्रस्तुत प्रकल्पाचे मार्गदर्शन करण्याची विनंती करणारे पत्र मंडळाच्या अध्यक्षांना लिहा. | किंवा | कचऱ्याचे सुयोग्य व्यवस्थापन करण्यासाठी माहिती पुस्तिकेची मागणी करणारे पत्र मंडळाच्या अध्यक्षांना लिहा. |

2) **बोलीभाषा**

**बोलीभाषेतील उतारा वाचून त्याखालील कृती सोडवा.** [5]

सुंदराक्काचं नी लहू गावड्याच्या कमळीचं कशावनं त् दांडगं भांडान पेटलं. देवचारागत यकीमकीच्या झिंज्या उसपित, वरबडून घित. नव्हे नव्हे तसल्या गाळ्या दून घित. सुंदराक्काचा आप्पा मदी पडोस बगी त्यास हिंगलून घिनात खलीबी आयकोन घेस तयार न्हाय. आमची म्हातारी न्हंगड्यास पडली. आदिच तिस कानेर सन व्हन्नाय. धुंबड आयकोन तिबी कनेत कनेत भाइर यली.

i. तक्ता पूर्ण करा. [2]

| प्रमाणभाषेतील शब्द | बोलीभाषेतील शब्द |
|---|---|
| आजारी असणे | _______ |
| आवाज / आरडाओरडा | _______ |
| | |
| घ्यायला | _______ |
| दंगा / गोंधळ | _______ |

ii. खालील कृती सोडवा. [3]

बोलीचे प्रकार

बोलीवरील प्रकार

बोलले जाणारे प्रदेश

**किंवा**

वरील बोलीभाषेतील उताऱ्याचे प्रमाणभाषेत भाषांतर करा.

3) **कथालेखन**

**खालील अपूर्ण कथा पूर्ण करून लिहा.** [5]

आमच्या शाळेची सहल निघाली होती. बसने प्रवास म्हणून सर्वच मुले आनंदात होती. गाणी, गप्पागोष्टी रंगल्या होत्या. पुढचा प्रवास जंगलातून होता. रात्रीचा प्रवास, सर्वत्र काळोख, रात्रीची शांतता, सर्वच अंगावर शहारे आणणारे. बसचा आवाज तेवढा रात्रीची शांतता भंग करीत होता. अचानक बस थांबली. सर्वांनाच काय झाले? याची उत्कंठा मी समोर पाहिले. गाडीच्या प्रकाशात समोर अत्यंत उमदे जनावर उभे होते. वाघाचे डोळे चमकत होते, आणि अचानक _______

ब) **भावार्थलेखन**

**1. दिलेल्या उताऱ्याचा स्वत:च्या शब्दांत 40 ते 50 शब्दांत भावार्थ लिहा.** [5]

कुठलीही अशी अटळ नियती नाही, की ज्यायोगे माणसाचं नशीब घडवलं जातं. निसर्गाची फक्त इतकीच अपेक्षा आहे, की फुलं ज्या सहजपणानं फुलतात, सहज रंग धारण करतात, सहजतेनं विकसित होतात, त्याप्रमाणंच जीवन फुलावं. फुलण्याचा, बहरण्याचा, कुणाचा अधिकार कुणी हिरावून घेऊ नये. कुणी कुणाचा मालक होऊ नये. त्याप्रमाणं कुणी कुणाचा गुलाम होऊ नये. जर ही इतकी विपुल धरती आहे, तर मालकी हक्काची ही कुंपणं कशासाठी? माणसं जर पाखरासारखी उडून जाणार असतील, तर पाखरासारखीच त्यांनी बेगमी करावी; परंतु पिढ्या न पिढ्या आपल्या संततीनं कुठलेही कष्ट न करता जगावं इतकी संपत्ती का जमा करावी? आणि अशा संपत्तीवर त्यांच्या मुलाबाळांनी अधिकार सांगावा इतकं क्षीण जीवन त्यांच्या संततीनं तरी का स्वीकारावं? परंतु माणसं पराकोटीची चिंता करतात.

2. **अभिप्रायलेखन**

**पुढील निवेदन लक्षात घेऊन त्याखालील कृती सोडवा.** **[5]**

सृजनानंद विद्यालय चंद्रपूर

**अपूर्व विज्ञान मेळावा**

उद्‌घाटक – डॉ. जयंत नारळीकर

(थोर शास्त्रज्ञ)

स्थळ – शाळेचे सभागृह

दि. 28 फेब्रु. 2017

वेळ: स. 8 ते सं. 5

विशेष आकर्षण – डॉ. जयंत नारळीकर
यांच्याशी संवाद साधण्याची संधी

**कृती –** वरील विज्ञानमेळाव्यास तुम्ही उपस्थित होतात अशी कल्पना करून मेळाव्याबाबत तुमचा अभिप्राय 60 ते 80 शब्दांत लिहा.

क) **निबंधलेखन**

**खालील लेखनप्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा.** **[5]**

1. | इ. 10वी – वर्गखोली |

   वरील घटक तुमच्याशी बोलत आहे अशी कल्पना करून इ. 10वी – वर्गखोलीचे मनोगत लिहा.

2. ‘व्यायामाचे महत्त्व’ या विषयावर तुमचे विचार लिहा.